जानेवारी २०२६

# महात्मा फुले कृषि विद्यापीठ

राहुरी - ४१३ ७२२, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र)

# ई वार्ता




LEGEND

| | | |
|---|---|---|
| | Central Campus of MPKV | |
| | Agril. Research Station | 27 |
| | Post Graduate Institute | 01 |
| | Agril. Technology Information Centre | 01 |
| | Regional Extension Centre | 04 |
| | District Extension Centre | 05 |
| | Krishi Vigyan Kendra | 04 |
| | Agricultural Tech. School | 08 |
| | Agricultural Engg. College | 02 |
| | Agricultural College | 08 |
| | Horticulture College | 02 |
| | ABM College -1 | 01 |
| @ | Food Technology College - 1 | 01 |
| # | Agriculture Polytechnic College - 1 | 01 |

मफुकृवि विस्तार प्रकाशन क्र. २८४१/२०२६

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

मफुकृवि ई वार्ता

जानेवारी २०२६

वर्ष :६, अंक क्रं. : ६१, जानेवारी, २०२६ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

## महात्मा फुले कृषि विद्यापीठात ७७ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा





**दि. २६ जानेवारी, २०२६.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे ७७ वा भारतीय प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी मा. कुलगुरु डॉ. विलास खर्चे यांचे हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी मार्गदर्शन करताना मा. कुलगुरु डॉ. विलास खर्चे म्हणाले की २६ जानेवारी, १९५० हा आपल्या देशाचा सुवर्ण दिवस असून या दिवशी आपण देशाचे संविधान स्विकारले. कृषि क्षेत्र हे आपल्या देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. कृषि क्षेत्राच्या प्रगतीमध्ये कृषि शास्त्रज्ञ, शेतकरी व शासन यांचा मोठा वाटा आहे. कृषि क्षेत्राच्या प्रगतीमध्ये महात्मा फुले कृषि विद्यापीठाचा मोलाचा वाटा आहे. गतवर्षी कृषि विद्यापीठाने ७ वाण, ३ कृषि अवजारे व ५९ तंत्रज्ञान शिफारशी शेतकऱ्यांसाठी प्रसारीत केल्या असून ३ वाण राष्ट्रीय पातळीवर प्रसारीत करण्यात आले आहे. गतवर्षी विद्यापीठाला दोन स्वामित्व हक्क मिळाले असून शिक्षण व संशोधनासाठी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संस्थांबरोबर ८ सामंजस्य करार करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांनी विविध क्रीडा स्पर्धांमध्ये ४ सुवर्ण, ३ रजत आणि ३ कांस्य पदके मिळविले आहेत. काळानुसार आपण शिक्षणामध्ये बदल करुन नविन राष्ट्रीय शिक्षण धोरणाची अंबलबजावणी करत आहोत. शेतकरीभिमुख संशोधनाबरोबरच नैसर्गिक शेतीला चालणा देत आहोत. विद्यार्थ्यांना कौशल्य विकास व उद्योजगतेला चालणा देण्यासाठी आपण इन्क्युबेशन सेंटर्स सुरु करत आहोत. कृषि विस्तारातसुध्दा आपण प्रभाविपणे काम करत आहोत. येत्या १७-१८ फेब्रुवारीला आपण फुले कृषि महोत्सव २०२६-थेट पीक प्रात्येक्षिके, शिवार फेरी आणि कृषि प्रदर्शनाचे आयोजन केलेले आहे. समृध्द गावे घडविण्यासाठी आपण फुले कृषि तंत्रज्ञान घरोघरी, समृध्दी येईल गावोगावी या संकल्पनेद्वारे विद्यापीठाच्या कार्यक्षातील १० जिल्ह्यातील १० गावे दत्तक घेवून एकात्मिक पध्दतीने कृषि तंत्रज्ञानाचा प्रसार करणार आहोत. कमी मनुष्यबळ असतांनादेखील विद्यापीठाने कृषि शिक्षण, संशोधन व विस्तार कार्यामध्ये मोठे योगदान दिले असल्याचे प्रतिपादन महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरु डॉ. विलास खर्चे यांनी केले.

या कार्यक्रमाला विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, संचालक संशोधन डॉ. विठ्ठल शिर्के, अधिष्ठाता डॉ. साताप्पा खरबडे, कुलसचिव तथा अपर जिल्हाधिकारी श्री. राजेंद्रकुमार पाटील, विद्यापीठ अभियंता श्री. मिलिंद ढोके, कृषि तंत्रज्ञानचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रशांत बोडके, कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. सचिन नलावडे, उपकुलसचिव (प्रशासन) श्री. विजय पाटील, विविध विभागांचे विभाग प्रमुख, शास्त्रज्ञ, प्राध्यापक, कर्मचारी उपस्थित होते. यावेळी एन.सी.सी. च्या विद्यार्थ्यांनी लेफ्टनंट डॉ. फुलसावंगे यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी संचलन केले. प्रजासत्ताक दिनानिमित्त संचालक राष्ट्रीय सेवा योजना तथा विद्यार्थी कल्याण कार्यालय, पदव्युत्तर कृषि महाविद्यालय व डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने व जिल्हा शल्य चिकित्सक, अहिल्यानगर यांच्या सहकार्याने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या रक्तदान शिबिरासाठी विद्यापीठाच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. वैशाली हिले यांनी मदत केली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुरक्षा अधिकारी श्री. गोरक्षनाथ शेटे यांनी केले.

## कृषि विद्यापीठात एक दिवसीय नैसर्गिक शेती कार्यशाळेचे आयोजन

**दि. २४ जानेवारी, २०२६.** महात्मा फुले कृषि विद्यापीठातील विस्तार शिक्षण संचालनालयांतर्गत विज्ञान केंद्रांचे प्रमुख व विषय विशेषज्ञांसाठी सेंद्रिय व नैसर्गीक शेती संशोधन व प्रशिक्षण केंद्रात एक दिवसीय नैसर्गिक शेती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषि





विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. विलास खर्चे होते. यावेळी व्यासपीठावर संचालक विस्तार शिक्षण डॉ. गोरक्ष ससाने, संचालक संशोधन डॉ. विठ्ठल शिर्के, आनंद कृषि विद्यापीठाचे कृषि विद्या विभाग प्रमुख डॉ. व्ही. जे. पटेल, प्राध्यापक कृषि कीटकशास्त्र डॉ. एच. सी. पटेल, कृषि तंत्रज्ञान शिक्षणाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रशांत बोडके उपस्थित होते. यावेळी मा. कुलगुरू डॉ. विलास खर्चे मार्गदर्शन करतांना म्हणाले की महात्मा फुले कृषि विद्यापीठ हे देशातले अग्रगण्य विद्यापीठ आहे. कृषिमधील कोणत्याही नवीन संशोधनासंदर्भात आपल्या विद्यापीठाकडे आशेने बघितले जाते. नैसर्गिक शेतीवर विद्यापीठ शास्त्रीयदृष्ट्या काम करत आहे. नैसर्गिक शेती करताना नैसर्गिक शेतीच्या सर्व घटकांचा अवलंब केला तर चांगले उत्पादन मिळते. नैसर्गिक शेतीमुळे जमिनीचे आरोग्य सुधारते व उत्पादन चांगले मिळते. कृषि विज्ञान केंद्रांनी प्रत्येक हंगामात त्यांच्या जिल्ह्याच्या पीक परिस्थितीवर आधारित पीक संग्रहालय तयार करावेत. कृषि विद्यापीठाने विकसित केलेले हंगामनिहाय तंत्रज्ञान त्या प्रक्षेत्रांवर प्रात्यक्षिकांद्वारे प्रदर्शित करावे. तंत्रज्ञान प्रसाराचे काम मिशन मोडमध्ये करा. फुले कृषि तंत्रज्ञान घरोघरी समृद्धी येईल गावोगावी या उपक्रमाद्वारे आपण विद्यापीठच्या कार्यक्षेत्रातील दहा जिल्ह्यातील दहा गावे दत्तक घेऊन एकात्मिक पद्धतीने कृषि तंत्रज्ञानाचा प्रसार करून समृद्ध गाव घडवणार आहोत.

यावेळी डॉ. गोरक्ष ससाणे प्रास्ताविक करताना म्हणाले की नैसर्गिक शेती ही आता काळाची गरज झाली आहे. या नैसर्गिक शेतीला चालना देण्यासाठी मा. कुलगुरूंच्या संकल्पनेतून या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. याप्रसंगी आनंद कृषि विद्यापीठाचे डॉ. व्ही. जे. पटेल आणि डॉ. एच. सी. पटेल यांनी गुजरातमध्ये नैसर्गिक शेतीवर केलेले प्रयोगासंदर्भात सादरीकरण केले. यावेळी त्यांनी नैसर्गिक शेतीमध्ये बिजामृत, जीवामृत, आच्छादन, अग्निअस्त्र, ब्रह्मास्त्र, निमास्त्र, दशपर्णीय अर्क यांचा उपयोग कसा करायचा याबद्दल मार्गदर्शन केले. यावेळी डॉ. प्रशांत बोडके, डॉ. व्ही.एस. पाटील, डॉ. उत्तम कदम, डॉ. उल्हास सुर्वे, डॉ. आर.टी. गायकवाड यांनी नैसर्गिक शेतीची सद्यस्थिती व भविष्यातील संधी, नैसर्गिक शेती अनुषंगिक संशोधन आणि त्याचा वापर, नैसर्गिक शेतीसाठी आवश्यक जमीन आरोग्य व्यवस्थापन, नैसर्गिक शेतीतील पिकांचे कीड व्यवस्थापन, नैसर्गिक शेतीतील पिकांचे रोग व्यवस्थापन या विषयांवर तज्ञांनी मार्गदर्शन केले. यावेळी सर्व प्रशिक्षणार्थींनी सेंद्रिय शेती प्रकल्पाच्या प्रक्षेत्रावर राबविण्यात येत असलेले नैसर्गिक शेतीच्या प्रयोगांना भेट दिली. याप्रसंगी पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग प्रमुख डॉ. दिनकर कांबळे, कृषि विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील कृषि विज्ञान केंद्रांचे प्रमुख, विषय विशेषज्ञ, कृषि विद्यापीठाचे शास्त्रज्ञ उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. भगवान देशमुख आणि आभार डॉ. सचिन सदाफळ यांनी मानले.

## वसुंधरा नैसर्गिक शेती आधारित प्रात्यक्षिक प्रक्षेत्र व देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्रास राज्यभवनाचे सचिव मा. डॉ. प्रशांत नारनवरे यांची भेट

**दि. १७ जानेवारी, २०२६.** कृषि महाविद्यालय, पुणे येथे विकसित करण्यात येत असलेल्या वसुंधरा नैसर्गिक शेती आधारित प्रात्यक्षिक प्रक्षेत्र व देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्रास राज्यभवनाचे सचिव मा. डॉ. प्रशांत नारनवरे यांनी भेट दिली. याप्रसंगी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. विलास खर्चे, राजभवनातील उपसचिव डॉ. राममूर्ती व नियंत्रक डॉ. नितीन देशपांडे, कृषि महाविद्यालय, पुणेचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. महानंद माने, विभागीय फळ संशोधन केंद्र, गणेशखिंड येथील सहयोगी संशोधन संचालक डॉ. सुभाष भालेकर उपस्थित होते.

यावेळी मा. डॉ. प्रशांत नारनवरे मार्गदर्शन करतांना म्हणाले की महाराष्ट्राचे मा. राज्यपाल श्री. आचार्य देवव्रत यांच्या निर्देशानुसार राज्यात नैसर्गिक शेतीसाठी आवश्यक संधी निर्माण करणे अत्यंत महत्त्वाचे असून आधुनिक काळात शेती क्षेत्रात अद्ययावत तंत्रज्ञानाचा प्रभावी अवलंब

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी
मफुकृवि ई वार्ता
जानेवारी २०२६







होणे आवश्यक आहे. नैसर्गिक शेतीच्या यशासाठी मोठ्या प्रमाणात नैसर्गिक संसाधनांची निर्मिती होणे अत्यावश्यक आहे. कृषि विद्यापीठातील नामवंत प्राध्यापकांनी पायाभूत विषयांवरील आपली व्याख्याने सुलभ व शेतकरी सुलभ पद्धतीने तयार करून याचे व्हिडिओ माध्यमातून थेट शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविणे आवश्यक आहे. कृषि क्षेत्रातील विविध विषयांमधील ज्ञान व कौशल्य यांच्या आधारे उद्यमशील कृषि उद्योजक घडविणे ही आजच्या काळाची गरज आहे. कृषि पदवीधरांना अधिक प्रात्यक्षिकाधिष्ठित शिक्षण देणे आवश्यक असून पाश्चिमात्य शिक्षण पद्धतीमुळे निर्माण झालेली ज्ञान व कौशल्यतील तफावत दूर करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. कृषि पदवीच्या विद्यार्थ्यांना पहिल्या वर्षापासूनच व्यापक कार्यक्षेत्रातील लोकाभिमुख ज्ञान व कौशल्य विकसित करण्याच्या तंत्राचा समावेश अभ्यासक्रमात करावा असे त्यांनी स्पष्ट केले. आपली पारंपारिक भारतीय शेतीपद्धती ही पशुपालनावर आधारित असल्यामुळे अधिक सुरक्षित होती मात्र वाढती लोकसंख्या आणि रासायनिक खते व कीटकनाशकांच्या अतिरेकी वापरामुळे जमिनीची सुपीकता घटत चालली आहे ही चिंतेची बाब आहे. शेती हे एक शास्त्र आहे, ती केवळ तर्कावर आधारित जोखीम नाही असे स्पष्ट करत त्यांनी शेतीतील प्रयोगशीलतेचे महत्त्व अधोरेखित केले. एकपीकपद्धतीमुळे जमिनीचे नैसर्गिक आरोग्य बिघडत असून त्यामध्ये बदल करणे आवश्यक आहे. मातीचा दर्जा टिकून ठेवण्यासाठी पीकफेरपालट अत्यावश्यक असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. तसेच शेतकरी आणि शास्त्रज्ञ यांच्यातील दरी कमी करणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी मार्गदर्शन करताना मा. कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांनी सचिवांनी मांडलेल्या मुद्द्यानुसार विद्यापीठ कार्यरत असून विद्यापीठातून पदवी घेऊन बाहेर पडणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याच्या उद्यमशीलतेला चालना देऊन त्यांच्या भविष्यातील वाटचालीसाठी विद्यापीठ कटिबद्ध असल्याची ग्वाही दिली. तसेच विद्यापीठाच्या विविध प्रक्षेत्रांवर नैसर्गिक शेतीसाठी आवश्यक संसाधन निर्मितीचे प्रकल्प मोठ्या प्रमाणावर विकसित करून त्यांचा प्रभावी प्रचार व प्रसार केला जाईल असे त्यांनी सांगितले. यावेळी देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्राच्या भेटीप्रसंगी या केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. सोमनाथ माने यांनी प्रकल्पामध्ये सुरू असलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली. डॉ. प्रशांत नारनवरे यांनी कृषि महाविद्यालयातील अनुभव आधारित अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांसोबत संवाद साधला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ. महानंद माने यांनी महाविद्यालयात सुरू असलेल्या नैसर्गिक शेती प्रात्यक्षिक प्रक्षेत्रासह संशोधन, शिक्षण व विस्तार कार्याचा आढावा सादर केला. या कार्यक्रमासाठी कृषि महाविद्यालय, पुणे येथील प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## उरुळी कांचन येथे महात्मा फुले कृषि विद्यापीठ व बायफ संस्था यांच्यामध्ये सामंजस्य करार

**दि. १४ जानेवारी, २०२६.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांच्या मार्गदर्शनाखाली उरुळी कांचन (पुणे) येथे महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी व बायफ डेव्हलपमेंट रिसर्च फाउंडेशन यांच्यामध्ये स्थानिक वाणांवर आधारित स्मार्ट हवामान सुसंगत आणि जैवविविधतेला चालना देणाऱ्या पीक पद्धती विकसित करणे, मृदा आरोग्य, मृदेमधील बहुपोषक तत्त्वांची कमतरता, भूजल संशोधन, नैसर्गिक संसाधन व्यवस्थापन या विषयांवर संयुक्तपणे संशोधन करण्यासाठी सामंजस्य करार करण्यात आला. याप्रसंगी मा. कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांच्या उपस्थितीत डॉ. विठ्ठल शिर्के आणि बायफ डेव्हलपमेंट रिसर्च फाउंडेशनचे प्रेसिडेंट आणि मॅनेजिंग ट्रस्टी डॉ. भरत काकडे यांनी या सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या केल्या. यावेळी काष्टी, मालेगाव येथील कृषि विज्ञान संकुलाचे प्रमुख डॉ. सचिन नांदगुडे, पुणे कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. महानंद माने, श्री. वामन कुलकर्णी, डॉ. विठ्ठल कवठाळे, डॉ. जयंत खडसे व श्री. ज्ञानेश्वर मोरे उपस्थित होते.



यावेळी मा. कुलगुरू डॉ. विलास खर्चे म्हणाले की आंतरराष्ट्रीय स्वयंसेवी संस्थांच्या भागीदारांसोबत सक्रिय सहभाग घेऊन नैसर्गिक संसाधन व्यवस्थापनाच्या उपक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यावर विशेष भर देण्यात येईल. शाश्वत विकास, पर्यावरण संवर्धन आणि ग्रामीण भागाच्या सर्वांगीण प्रगतीस या सामंजस्य करारामुळे मोठी चालना मिळेल. स्थानिक वाणावर आधारित स्मार्ट हवामान सुसंगत आणि जैवविविधतेला चालना देणाऱ्या पीक प्रणाली विकसित करणे, मृदा आरोग्य, मृदेमधील बहु पोषक तत्वांची कमतरता, भूजल संशोधन, नैसर्गिक संसाधन व्यवस्थापन या विषयांवर संयुक्तपणे संशोधन करण्यावर भर देण्यात येईल असे ते यावेळी म्हणाले. याप्रसंगी डॉ. भरत काकडे म्हणाले की हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर हवामान प्रतिरोधक शेती प्रणाली विकसित करणे आणि जैवतंत्रज्ञानाचा वापर करून पिकाची स्थिती मॉनिटरिंग करणे, शेतकऱ्यांना नैसर्गिक शेती व उत्पादन वाढीसाठी प्रशिक्षण देणे तसेच कमी खर्चिक शेती ऊर्जा व ग्रामीण विकासासाठी संयुक्त उपक्रम राबविणे या गोष्टींवर विशेष भर देण्यात येईल. यावेळी महात्मा फुले कृषि विद्यापीठातील शास्त्रज्ञ व कर्मचाऱ्यांनी बायफ रिसर्च फाउंडेशनला भेट देऊन तेथील नैसर्गिक प्रात्यक्षिक शेती, इनोव्हेशन सेंटर, स्पाइनलेस कॅक्टस या प्रकल्पांची पाहणी केली. याप्रसंगी त्यांना संस्थेत सुरू असलेल्या शाश्वत शेती पद्धती, हवामान सुसंगत शेती, जैवविविधता संवर्धन आणि नैसर्गिक संसाधन व्यवस्थापनाची सविस्तर माहिती देण्यात आली.

## फळपिकांमध्ये जैविक आणि अजैविक ताण व्यवस्थापनासाठी जैवतंत्रज्ञान आणि पारंपारिक दृष्टिकोन या विषयावरील २१ दिवसांच्या प्रशिक्षण संपन्न






**दि. २ जानेवारी, २०२६.** महात्मा फुले कृषि विद्यापीठातील उद्यानविद्या विभागांतर्गत असलेल्या उद्यानविद्या (फळपिके) विभागातील प्राध्यापकांसाठी अद्ययावत प्रशिक्षण केंद्रामार्फत फळपिकांमध्ये जैविक आणि अजैविक ताण व्यवस्थापनासाठी जैवतंत्रज्ञान आणि पारंपारिक दृष्टिकोन या विषयावरील २१ दिवसांच्या प्रशिक्षण कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. विलास खर्चे होते. याप्रसंगी व्यासपीठावर विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के, अधिष्ठाता डॉ. साताप्पा खरबडे व उद्यानविद्या विभाग प्रमुख तथा प्रशिक्षण कार्यक्रमाचे संचालक डॉ. बी.टी. पाटील उपस्थित होते.

यावेळी मा. कुलगुरू डॉ. विलास खर्चे अध्यक्षीय मार्गदर्शन करतांना म्हणाले की महात्मा फुले कृषि विद्यापीठाने फळपिकांमध्ये फार

मोठे संशोधन केले आहे. फळपिकातील घन लागवड तंत्रज्ञान हे राहुरी कृषि विद्यापीठाचे महत्त्वाचे संशोधन आहे. फळपिकांवर वातावरणातील बदलांचा मोठा परिणाम जाणवत आहे. फळपिकामध्ये फळांची गळती तसेच इतरही समस्या आहेत. जैवतंत्रज्ञानाच्या प्रभावी वापराने फळपिकांवरील समस्या सोडवण्यासाठी मदत होऊ शकते. शेतकरी आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होण्यामध्ये फळपिकांचा मोठा वाटा आहे. भारतामध्ये ३६९ दशलक्ष टन फळपिकांचे उत्पादन होते. यावरून भारताच्या विकासामध्ये फळपिकांचे योगदान महत्त्वाचे असल्याचे सिद्ध होते. राहुरी कृषि विद्यापीठाने फळपिकांमध्ये महत्त्वाचे असलेल्या डाळिंब पिकामध्ये फुले भगवा, फुले सुपर भगवा यासारखे संपूर्ण भारतात लागवडीमध्ये मोठे क्षेत्र असलेले वाण दिले आहेत. फळपिकातील महत्त्वाच्या तंत्रज्ञान शिफारशी प्रसारित केलेल्या आहेत. या २१ दिवसांच्या प्रशिक्षणाचा फायदा तुमच्या शैक्षणिक करिअरसाठी महत्त्वाचे ठरू शकते. याप्रसंगी डॉ. साताप्पा खरबडे, डॉ. विठ्ठल शिर्के व डॉ. गोरक्ष ससाणे यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ. बी.टी. पाटील यांनी या प्रशिक्षणाची रुपरेषा तसेच आत्तापर्यंत घेतलेल्या प्रशिक्षणांचा आढावा सादर केला. या २१ दिवसीय प्रशिक्षणामध्ये ५४ विविध विषयांवर व्याख्याने तसेच नऊ प्रात्यक्षिके व चार अभ्यासदौरे आयोजीत करण्यात आले आहेत. या प्रशिक्षणासाठी महाराष्ट्रासह सहा राज्यातील २५ प्रशिक्षणार्थी सहभागी झाले आहेत. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रशिक्षण कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. ज्ञानेश्वर क्षिरसागर यांनी तर आभार प्रशिक्षण कार्यक्रमाचे सहसमन्वयक डॉ. जितेंद्र ढेमरे यांनी मानले. यावेळी विविध विभागांचे विभाग प्रमुख तसेच उद्यानविद्या विभागातील शास्त्रज्ञ, प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते.

## आयसीआयसीआय फाउंडेशन आणि महात्मा फुले कृषि विद्यापीठात सामंजस्य करार



**दि. १३ जानेवारी, २०२६.** कृषि महाविद्यालय, पुणे येथे आयसीआयसीआय फाउंडेशन फॉर इन्क्लुसिव्ह ग्रोथ आणि महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी यांच्यात महत्त्वपूर्ण सामंजस्य करार करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. विलास खर्चे होते. याप्रसंगी संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के आणि आयसीआयसीआय फाउंडेशनचे प्रकल्प संचालक श्री. दीपक पाटील यांनी या सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या केल्या. यावेळी अधिष्ठाता (कृषि) डॉ. साताप्पा खरबडे, कृषि महाविद्यालय, पुणेचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. महानंद माने, गणेशखिंड येथील विभागीय कृषि संशोधन केंद्राचे सहयोगी संशोधन संचालक डॉ. सुभाष भालेकर, कृषि विज्ञान संकुल काष्टी मालेगांवचे डॉ. सचिन नांदगुडे, आय. सी. आय. सी. आयचे पदाधिकारी श्री. चेतन पाटील, श्री. स्वप्निल ढाकळे व श्री. नितीन गुरव उपस्थित होते.

याप्रसंगी अध्यक्षीय मार्गदर्शन करतांना मा. कुलगुरु डॉ. विलास खर्चे म्हणाले की विद्यापीठातील शास्त्रज्ञांकडे अपार बौद्धिक क्षमता असूनही निधीअभावी संशोधन कार्यात मर्यादा येत आहेत. तसेच जमीन आरोग्याच्या समस्या आणि हवामान बदलासारख्या वाढत्या आव्हानांच्या पार्श्वभूमीवर नैसर्गिक शेती पद्धतीवर आधारित संशोधनावर अधिक भर देणे काळाची गरज आहे. यावेळी श्री. दीपक पाटील यांनी सांगितले की, आयसीआयसीआय बँक देशातील अग्रगण्य बँकांपैकी एक असून उपजीविका, पर्यावरण आणि आरोग्य या क्षेत्रांमध्ये सीएसआर निधीतून भरीव योगदान देण्यासाठी बँक सातत्याने प्रयत्नशील आहे. त्याच अनुषंगाने भारतीय कृषि संशोधन परिषद तसेच राज्यातील कृषि विद्यापीठांच्या विविध संशोधन प्रकल्पांना आर्थिक सहाय्य देण्यासाठी दूरगामी आणि सकारात्मक सहकार्य करण्यात येत असल्याचे त्यांनी नमूद केले. याप्रसंगी डॉ. विठ्ठल शिर्के म्हणाले की आयसीआयसीआय सारख्या विश्वासार्ह आणि दर्जेदार दातृत्व संस्थांच्या सहकार्याचा प्रभावी लाभ घेण्यासाठी विद्यापीठाने गरजेनुसार योग्य, दर्जेदार आणि उद्दिष्टपूर्तीस पूरक प्रस्ताव सादर करणे अत्यंत आवश्यक आहे. कृषि संशोधन,

पायाभूत सुविधा विकास आणि शेतकऱ्यांच्या सर्वांगीण हिताच्या दृष्टीने हा सामंजस्य करार मैलाचा दगड ठरेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. यावेळी डॉ. साताप्पा खरबडे म्हणाले की कृषि शिक्षण, संशोधन आणि विस्तार या त्रिसुत्रीवर काम करणाऱ्या या विद्यापीठाच्या वतीने या सामंजस्य करारांची अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्यात येतील. यावेळी डॉ. सुभाष भालेकर यांनी सन २०२५-२६ या वर्षीच्या आय सी आय सी आय च्या माध्यमातून प्राप्त भरघोस निधीतून बळकटीकरणासाठी विकसित केलेल्या विविध कामांची यशस्वीरीत्या अंमलबजावणी करण्यात आल्याचे सादरीकरण केले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ. सुनिल लोहाटे यांनी केले तर आभार डॉ. सतिश जाधव यांनी मानले. यावेळी कृषि महाविद्यालयातील प्राध्यापक आणि विभागीय कृषि संशोधन केंद्रातील शास्त्रज्ञ व कर्मचारी उपस्थित होते.

## कृषि विद्यापीठात मृदाशास्त्र विभागांतर्गत प्रमाणपत्र अभ्यासक्रम प्रशिक्षणाचे आयोजन






**दि. १९ जानेवारी, २०२६.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील पदव्युत्तर महाविद्यालयातील मृदाशास्त्र विभागामध्ये पाच दिवसीय माती व पाण्याची चाचणीमधील विश्लेषणात्मक तंत्रे या विषयावरील प्रमाणपत्र अभ्यासक्रम प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रशिक्षण कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. विलास खर्चे होते. याप्रसंगी विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, कृषि तंत्रज्ञान शिक्षणाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रशांत बोडके, मृदाशास्त्र विभाग प्रमुख डॉ. भीमराव कांबळे, प्रशिक्षण कार्यक्रमाचे सहसमन्वयक डॉ. रितु ठाकरे व डॉ. श्रीगणेश शेळके उपस्थित होते.

याप्रसंगी मा. कुलगुरू डॉ. विलास खर्चे मार्गदर्शन करतांना म्हणाले की हरितक्रांतीमुळे पिकांच्या उत्पादकतेत मोठी वाढ झाली पण जमिनीच्या व्यवस्थापनात आपण कमी पडलो. जास्त उत्पादन घेण्यासाठी रासायनिक खतांचा मोठ्या प्रमाणात वापर केला गेला. त्यामुळे जमिनीचे आरोग्य बिघडले. ज्या प्रमाणात उत्पादन घेतले त्या प्रमाणात जमिनीला आवश्यक असणारे सेंद्रिय पदार्थ व पोषकतत्वे दिली नाहीत परिणामी जमिनीची प्रत खालावली. जमिनीतील सेंद्रिय कर्बाचे प्रमाण ०.६% पेक्षा खाली आले. जमीन पुन्हा सुपीक करण्यासाठी शेतातील पिकांचे अवशेष न जाळता त्यापासून सेंद्रिय खतांची निर्मिती करून त्याच्या वापराने जमिनीचे संवर्धन करावे लागेल. शाश्वत शेतीसाठी जमिनीचे योग्य व्यवस्थापन करणे गरजेचे आहे. लोकसंख्या वाढत असून नागरिकीकरण व औद्योगिकीकरणामुळे शेतीसाठी जमीन कमी होत आहे. या परिस्थितीत आहे त्या जमिनीची प्रत सुधारण्याबरोबरच पिकांची उत्पादकता वाढविण्यासाठी माती व पाणी परीक्षण करून खत व्यवस्थापन करणे गरजेचे आहे. या प्रशिक्षणामधून परीक्षार्थींनी पुरेपूर ज्ञान आत्मसात करून त्याचा उपयोग शेतकर्यांसाठी करावा असे आवाहन त्यांनी यावेळी केले. डॉ. गोरक्ष ससाणे आपल्या भाषणात म्हणाले की जमिनीचे आरोग्य फार महत्त्वाचे असून पिकांची वाढ ही पूर्णपणे जमिनीवर अवलंबून असते. जमीन सुपीक असेल तर पिकांची उत्पादन क्षमता चांगली असते. प्रशिक्षणार्थ्यांनी माती, पाणी तपासणीतील सर्व बारकावे शिकून घेण्याचे आवाहन त्यांनी यावेळी प्रशिक्षणार्थींना केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना डॉ. भीमराव कांबळे म्हणाले की मातीचे चाचणी करून शिफारस देणे हा या प्रशिक्षणाचा मुख्य उद्देश आहे. या प्रशिक्षणासाठी दहा जिल्ह्यातून विद्यापीठातील मृदाशास्त्र विषयातील अधिकारी, खाजगी माती तपासणी प्रयोगशाळेतील कर्मचारी, प्रगतशील शेतकरी व विद्यार्थी असे २७ प्रशिक्षणार्थी उपस्थित आहेत. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. रितू ठाकरे यांनी तर आभार डॉ. श्रीगणेश शेळके यांनी मानले. या कार्यक्रमासाठी आंतरविद्याशाखा जलसिंचन विभाग प्रमुख डॉ. विजय पाटील, प्रसारण केंद्र प्रमुख डॉ. सचिन सदाफळ, मृदाशास्त्र विभागातील शास्त्रज्ञ, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

वर्ष :६, अंक क्रं. : ६१, जानेवारी, २०२६ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

## कसबे डिग्रज येथील कृषि संशोधन केंद्र आणि तंत्र विद्यालय येथे मा. कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांची भेट




**दि. १९ जानेवारी, २०२६.** कसबे डिग्रज तालुका मिरज जिल्हा सांगली येथील कृषि संशोधन केंद्र आणि कृषि तंत्र विद्यालयास महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांनी भेट दिली. यावेळी त्यांनी शास्त्रज्ञांशी आणि विद्यार्थ्यांशी चर्चा करून त्यांना मार्गदर्शन केले. यावेळी कृषि संशोधन केंद्राचे प्रभारी अधिकारी डॉ. श्रीमंत राठोड, कोल्हापूर येथील सहयोगी संशोधन संचालक डॉ. सुनील कराड, कुलगुरूंचे तंत्र अधिकारी डॉ. पवन कुलवाल, कृषि तंत्र विद्यालयाचे प्राचार्य डॉ. मनोज माळी उपस्थित होते. याप्रसंगी मा. कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांनी कृषि संशोधन केंद्र आणि तंत्र विद्यालय या कार्यालयात भेट देऊन तेथील संशोधनात्मक, शैक्षणिक, विस्तार व प्रशासकीय कार्याचा आढावा घेतला. यावेळेस त्यांनी संशोधन केंद्राची उत्पत्ती जसे की विकसित केलेले विविध वाण, भूमिगत निचरा प्रणाली, क्षारपड जमीन सुधारणा, हळद संशोधन आणि परिसरातील तंत्र विद्यालयाचे कार्य याबद्दलची माहिती घेतली. यावेळेस मार्गदर्शन करताना मा. कुलगुरू डॉ. विलास खर्चे म्हणाले की कृषि संशोधन केंद्राचे कार्य तसेच तंत्र विद्यालयाचे कार्य हे सर्वांसाठीच उपयुक्त तसेच हितकारक आहे. या संशोधन केंद्राच्या संशोधन कार्याचा शेतकऱ्यांसाठी मोठ्या प्रमाणात फायदा होईल तसेच या तंत्रज्ञानाचा प्रसार व्हावा आणि पर्यायाने राज्याच्या विकासाला हातभार लागावा. यामुळे राज्याची आत्मनिर्भरता वाढेल. यावेळी त्यांनी प्रक्षेत्रावर भेट देऊन पीक पाहणी तसेच संशोधन कार्याचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी त्यांनी सूक्ष्म अन्नद्रव्ये निर्मिती प्रयोगशाळा, हायटेक ग्रीन हाऊस, रोपवाटिका, हळद संशोधन याची माहिती घेतली. या भेटीप्रसंगी डॉ. श्रीमंत राठोड यांनी संशोधन केंद्राची कार्ये, विविध वाणांची माहिती, उत्पन्न वाढीचे मार्ग, संशोधन केंद्र बळकटीकरणासाठी राबविण्यात आलेले प्रकल्प यांची माहिती सादरीकरणाद्वारे मा. कुलगुरू महोदयांना दिली. कृषि तंत्र विद्यालयाचे प्राचार्य डॉ. मनोज माळी यांनी सादरीकरणाद्वारे तंत्र विद्यालयाचा आढावा सादर केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. संग्राम काळे यांनी तर आभार डॉ. सचिन महाजन यांनी मानले. यावेळी संशोधन केंद्राचे आणि कृषि तंत्र विद्यालयाचे सर्व अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

## मा. कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांची निफाड येथील कृषि संशोधन केंद्रास भेट

**दि. २५ जानेवारी, २०२६.** कुंदेवाडी, ता. निफाड जि. नाशिक येथील कृषि संशोधन केंद्राला महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांनी सदिच्छा भेट दिली. याप्रसंगी संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के, विभागीय कृषि संशोधन केंद्र, इगतपुरी येथील सहयोगी संशोधन संचालक डॉ. हेमंत पाटील, कुलगुरुंचे तांत्रिक अधिकारी तथा कापूस पैदासकार डॉ. पवन कुलवाल, प्रभारी गहू विशेषज्ञ प्रा. भालचंद्र म्हस्के व डॉ. निलेश मगर उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना मा. कुलगुरू डॉ. विलास खर्चे म्हणाले की या कृषि संशोधन केंद्राने आतापर्यंत गव्हाचे ३२ वाण विकसित केले असून शेतकरीउपयोगी तंत्रज्ञान विकसित केले आहे. या कृषि संशोधन केंद्राला सन २०३२ मध्ये १०० वर्षे पूर्ण होत असल्याने संशोधन केंद्राच्या बळकटीकरणासाठी आत्तापासूनच प्रयत्न करणे गरजेचे आहे. या संशोधन केंद्राने शेतकऱ्यांना फायदेशीर तंत्रज्ञान विकसित केले आहे, त्याचा प्रसार या संशोधन केंद्रामार्फत होत आहे. संशोधन केंद्रावर संशोधनासाठी आणि शेतकऱ्यांसाठी उपयुक्त अशी सुसज्ज माती पाणी परीक्षण प्रयोगशाळा, जिवाणू खते, जैविक कीटकनाशके, बुरशीनाशके तसेच सूक्ष्म अन्नद्रव्य तयार करण्यासाठी प्रयोगशाळा बळकट करण्यासाठी ठोस अशी तरतूद करणार आहे. जमिनीचे आरोग्य टिकवण्यासाठी शाश्वत असे तंत्रज्ञान विकसित करणे आणि ते तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवणे गरजेचे आहे. याचबरोबर काळाची पाऊले ओळखून शेतकऱ्यांच्या समस्या समजावून त्यानुसार संशोधन करणे






आवश्यक आहे. हे कृषि संशोधन केंद्र महात्मा फुले कृषि विद्यापीठातील एक महत्त्वाचे संशोधन केंद्र असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या भेटीदरम्यान त्यांनी संशोधन केंद्राच्या संपूर्ण संशोधनाचा आढावा घेतला. यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. भालचंद्र म्हस्के यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. निलेश मगर यांनी केले.

## कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष शिबिराचे उद्घाटन संपन्न



**दि. १० जानेवारी, २०२६.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठातील डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष शिबिराचे आयोजन दि. ८ जानेवारी ते १४ जानेवारी, २०२६ या कालावधीत राहुरी तालुक्यातील बाभुळगाव येथे करण्यात आले होते. या शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे अधिष्ठाता (कृषि) डॉ. साताप्पा खरबडे मार्गदर्शन करताना होते. याप्रसंगी कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. सचिन नलावडे, विद्यार्थी परिषदेचे उपाध्यक्ष डॉ. कैलास कांबळे, राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक तथा विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. विलास आवारी, जलसिंचन व निचरा अभियांत्रिकी विभाग प्रमुख डॉ. शैलेंद्र गडगे, अक्षय ऊर्जा अभियांत्रिकी विभाग प्रमुख डॉ. वीरेंद्र बारई, राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्यक्रम अधिकारी डॉ. संगीता शिंदे,बाबुळगावच्या सरपंच सौ. मुक्ताबाई गिन्हे व महाविद्यालयाचे सहाय्यक कुलसचिव श्री. वैभव बारटक्के उपस्थित होते.

यावेळी डॉ. साताप्पा खरबडे मार्गदर्शन करतांना म्हणाले की राष्ट्रीय सेवा योजनेमुळे विद्यार्थ्यांमध्ये शिस्त तसेच नेतृत्व गुण वाढीस लागतात. विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीवेबरोबरच राष्ट्रहिताची भावनासुद्धा वृद्धिंगत होते. अशाप्रकारे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्व मोठे आहे. यावेळी सरपंच सौ. मुक्ताबाई गिन्हे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. डॉ. संगिता शिंदे यांनी प्रास्ताविक केले. १४ जानेवारी २०२६ पर्यंत चालणाऱ्या या विशेष शिबिरामध्ये जलसंधारण, पाणलोट क्षेत्र विकास, आरोग्यविषयक शिबिरे, पथनाट्य, वृक्षारोपण, ग्राम स्वच्छता व सर्वेक्षण तसेच ड्रोनबद्दलचे प्रात्यक्षिक असे विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन

विद्यार्थी केदार कोळी व जयेश चौधरी यांनी तर आभार विद्यार्थिनी कुमारी सोनाली गोयकर हिने मानले. या कार्यक्रमासाठी कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राध्यापक, कर्मचारी तसेच बाभुळगावचे उपसरपंच श्री. दत्तात्रय ससाणे, ग्रामसेवक श्री. भाऊसाहेब बोंदे, श्री. गोरक्षनाथ गिऱ्हे तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कोकणगाव येथे एक दिवसीय शेतकरी प्रशिक्षण व कृषि निविष्ठा वाटप कार्यक्रम संपन्न



**दि. १५ जानेवारी, २०२६.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांच्या मार्गदर्शनाखाली व उद्यानविद्या विभाग प्रमुख डॉ. बी. टी. पाटील यांचे नियोजनाखाली उद्यानविद्या विभागअंतर्गत असलेल्या अखिल भारतीय समन्वित भाजीपाला संशोधन प्रकल्प व भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने अनुसूचित जाती प्रवर्गासाठी एक दिवसीय शेतकरी प्रशिक्षण व निविष्ठा वाटप कार्यक्रम कोकणगाव ता. संगमनेर येथील कृषि विभागाच्या बीजगुणन केंद्रामध्ये संपन्न झाला. यावेळी डॉ. शर्मिला शिंदे, डॉ. शालिग्राम गांगुर्डे संगमनेर येथील बीजगुण केंद्राचे उप कृषि अधिकारी श्री. टी.व्ही. सूर्यवंशी , मंडल कृषि अधिकारी श्री. विक्रम भवारी व कृषि सहाय्यक श्री. श्रीपत तरटे उपस्थित होते.

यावेळी झालेल्या प्रशिक्षण कार्यक्रमांमध्ये डॉ. शर्मिला शिंदे यांनी भाजीपाला पिकांचे दैनंदिन आहारातील महत्त्व,सेंद्रिय भाजीपाला लागवड, माती परीक्षणाचे महत्व, जैविक संवर्धन खतांचा उपयोग, डॉ. शालिग्राम गांगुर्डे यांनी भाजीपाला पिकांवरील किडींचे एकात्मिक कीड व्यवस्थापन यावर मार्गदर्शन केले. याप्रसंगी शेतकऱ्यांना किट म्हणून भेंडी तोडणी यंत्र, सायकल कोळपे, खुरपी, शेवगा, शेंगा काढणी यंत्र, पिवळे चिकट सापळे व मका सोलनि यंत्र या कृषि निविष्ठांचे वितरण करण्यात आले. या प्रशिक्षण कार्यक्रमाच्या आयोजनासाठी संगमनेर येथील उपविभागीय कृषि अधिकारी श्री. अक्षय गोसावी, तालुका कृषि अधिकारी श्रीमती रेजा बोडके यांचे सहकार्य लाभले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार डॉ. शर्मिला शिंदे यांनी मानले. या कार्यक्रमासाठी शिंदोडी, पिंपरने,तळेगाव, कोकणगाव तसेच परिसरातील ५० पेक्षा जास्त शेतकरी उपस्थित होते.

## आंबा पिकावरील तुडतुड्यांचे एकात्मिक व्यवस्थापन असे करा : राहुरी कृषि विद्यापीठातील हॉर्टसॅपचा सल्ला

**दि. ५ जानेवारी, २०२६.** सध्या पश्चिम महाराष्ट्र व मराठवाडा भागात आंबा बागांमध्ये मोहोर येण्यास सुरुवात झाली असून काही ठिकाणी मोहोर अवस्थेत तुडतुडे या किडीचा प्रादुर्भाव वाढताना दिसून येत आहे. विशेषतः ॲम्रिटोडस ॲटकिन्सोनी या प्रजातीचा प्रादुर्भाव काही बागांमध्ये तीव्र स्वरूपात आढळून येत आहे. त्या अनुषंगाने महात्मा फुले कृषि विद्यापीठातील वनस्पती रोगशास्त्र व अनुजीवशास्त्र विभाग प्रमुख डॉ. रविंद्र गायकवाड, डॉ. संजय कोळसे व डॉ. प्रवीण खैरे (हॉर्टसॅप प्रकल्प, वनस्पती रोगशास्त्र व अणुजीवशास्त्र विभाग) व किटकशास्त्रज्ञ डॉ. सखाराम आघाव (किटकशास्त्र विभाग) यांच्याकडून शेतकऱ्यांना तुडतुडे या किडीचा प्रादुर्भाव आढळल्यास वेळीच उपाययोजना कराव्या असा सल्ला देण्यात आला.

तुडतुड्यांची पिल्ले व प्रौढ अवस्था पाने, मोहोर व लहान फळांमधून रस शोषून घेतात. त्यामुळे फुलकळ्या व फुले कोमेजून गळून पडतात तसेच नुकतीच लागलेली लहान फळे मोठ्या प्रमाणावर गळतात. किडीच्या चिकट गोड स्रावावर काळी बुरशी (सूटी मोल्ड) वाढून प्रकाशसंश्लेषणात अडथळा निर्माण होतो. योग्य वेळी नियंत्रण न केल्यास २० ते १०० टक्क्यांपर्यंत उत्पादनामधे घट होण्याची शक्यता आहे.

वर्ष :६, अंक क्रं. : ६१, जानेवारी, २०२६ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी



१० तुडतुडे प्रति पालवी किंवा मोहोर याप्रमाणे आर्थिक नुकसान पातळी आढळल्यास तात्काळ नियंत्रण उपाययोजना करणे आवश्यक आहे. या किडीचे एकात्मिक व्यवस्थापन करतांना झाडांची योग्य छाटणी करून बागेत हवा व सूर्यप्रकाश खेळता राहील याची काळजी घ्यावी. बाग तणमुक्त व स्वच्छ ठेवावी. नत्रयुक्त खतांचा अतिरेक टाळून संतुलित खत व्यवस्थापन करावे. प्रादुर्भावाच्या सुरुवातीला अॅझाडिरॅक्टीन (१०००० पी.पी.एम.) या निमयुक्त किटकनाशकाची २–३ मिली प्रती लिटर पाणी याप्रमाणे फवारणी करावी. आंब्याला मोहोर येत असतांना लेकॅनीसिलियम लेकॅनी किंवा मेटारायझियम ॲनिसोप्लिया या जैविकबुरशीयुक्त किटकनाशकाची ५ ग्रॅम प्रती लिटर पाणी या प्रमाणात ७ दिवसाच्या अंतराने दोन फवारण्या कराव्यात. आर्थिक नुकसान पातळी ओलांडल्यास व मित्र किटकांचे संवर्धन लक्षात घेऊन पुढीलपैकी एक किटकनाशक आलटून–पालटून वापरावे: बुप्रोफेझिन (२५ टक्के एस.सी.) १ ते २ मिली किंवा फ्लोनिकॅमिड (५० टक्के डब्ल्यू.जी.) ०.४ ग्रॅम किंवा पायमेट्रोझाईन (५० टक्के डब्ल्यू.जी.) ०.३ ग्रॅम किंवा टोलफेनपायरॅड (१५ टक्के ई.सी.) २ मिली किंवा इमिडाक्लोप्रिड (१७.८० टक्के एस.एल.) ०.४ मिली किंवा थायामेथोक्साम (२५ टक्के डब्ल्यू.जी.) ०.१ ग्रॅम प्रति लिटर पाणी या प्रमाणात घेऊन फवारणी करावी. ही सर्व किटकनाशके लेबलक्लेमप्राप्त आहेत. आंबा उत्पादक शेतकऱ्यांनी बागेची नियमित पाहणी करून तुडतुड्यांचा प्रादुर्भाव आढळताच वरील शिफारशीनुसार त्वरीत उपाययोजना कराव्यात असे आवाहन महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील हॉर्टसॅप प्रकल्पाद्वारे करण्यात येत आहे.

## राहुरी कृषि विद्यापीठामार्फत निंबवडे येथे हॉर्टसॅप अंतर्गत डाळिंबावरील तेल्या रोगाबाबत मार्गदर्शन



**दि.९ जानेवारी,२०२६.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी व कृषि विभाग, महाराष्ट्र शासन, पुणे समन्वित हॉर्टसॅप प्रकल्पांतर्गत २०२५–२६ या वर्षासाठी निंबवडे (ता. आटपाडी, जि. सांगली) गावात डाळिंब पिकावरील तेल्या रोगासाठी आर्थिक नुकसान पातळी आढळून आलेल्या क्षेत्रांसाठी विशेष सल्ला देण्यात आला. महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील वनस्पती रोगशास्त्र व अनुजीवशास्त्र विभागाने तयार केलेली डाळिंब तेल्या रोगावरील सविस्तर मार्गदर्शन पुस्तिका ऑनलाईन ई–मेल व व्हॉट्सअॅपच्या माध्यमातून संबंधित तालुका कृषि अधिकारी व सहाय्यक कृषि अधिकारी श्री. रविंद्र गुटकुडे यांना पाठविण्यात आली होती. सदर मार्गदर्शक पुस्तिकांचे निंबवडे ग्रामपंचायत कार्यालयात तसेच तेल्या रोगाने आर्थिक नुकसान पातळी ओलांडलेल्या शेतकऱ्यांच्या शेतावर प्रत्यक्ष भेट देऊन वाटप करण्यात आले. या दरम्यान शेतकऱ्यांना

डाळिंब तेल्या रोगाचे लक्षणे, प्रतिबंधात्मक उपाय, योग्य कीड–रोग नियंत्रण पद्धती व शाश्वत व्यवस्थापनाबाबत मार्गदर्शन करण्यात आले. विद्यापीठामार्फत सुचविण्यात आलेल्या उपाययोजनांमुळे शेतकऱ्यांना वेळेवर व अचूक नियंत्रण करण्यास मदत होणार आहे. सदर प्रक्षेत्र भेटीसाठी प्रकल्प प्रमुख तथा विभाग प्रमुख डॉ. रविंद्र गायकवाड, प्रकल्प समन्वयक डॉ. संजय कोळसे व संशोधन सहयोगी डॉ. प्रवीण खैरे, हॉर्टसॅप प्रकल्प, वनस्पती रोगशास्त्र व अनुजीवशास्त्र विभाग, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

## कृषि महाविद्यालय, संशोधन केंद्र व तंत्र विद्यालयांचे विविध उपक्रम

### कृषि महाविद्यालय, धुळे येथे राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन





**दि. २७ जानेवारी, २०२६.** कृषि महाविद्यालय, धुळे येथील राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष श्रमसंस्कार शिबिराचे उद्घाटन वडजाई येथे झाले. शाश्वत विकासासाठी युवक पाणलोट व्यवस्थापन आणि पडीक जमीन विकासावर विशेष भर या विषयावर आधारित हे सात दिवसांचे शिबिर आयोजित करण्यात आले आहे. याप्रसंगी सहयोगी अधिष्ठाता डॉ. बी. एम. इल्हे, मुख्य समुपदेशक (विद्यार्थी) डॉ. विश्वनाथ शिंदे, विद्यार्थी कल्याण अधिकारी प्रा. जे. एस. सूर्यवंशी उपस्थित होते. यावेळी या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून जवाहर शिक्षण प्रसारक संस्थेचे प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, वडजाई, ता. जि. धुळेचे मुख्याध्यापक श्री. जयंतराव भगवान पाटील उपस्थित होते.

यावेळी अध्यक्षीय मार्गदर्शन करताना डॉ. बी. एम. इल्हे म्हणाले की राष्ट्रीय सेवा योजना ही राष्ट्र निर्मितीची चळवळ आहे. मी नव्हे आपण या ब्रीदवाक्यानुसार कार्य करून समाजात खरे परिवर्तन घडवावे असे यावेळी त्यांनी आवाहन केले. डॉ. जे. एस. सूर्यवंशी यांनी आपल्या भाषणात जलसंधारण व पडीक जमीन विकासाच्या महत्त्वाच्या मुद्द्यावर भर दिला. या शिबिरामध्ये स्वयंसेवक स्वच्छता अभियान व ग्राम स्वच्छता, जलसंधारण व्यवस्थापन व पाणलोट विकास, पडीक जमिनी विकास व माती धूप प्रतिबंध, जनजागृती फेरी व शासकीय योजनांची माहिती, शालेय विद्यार्थ्यांना करिअर मार्गदर्शन व जैविक शेती व ऊर्जा बचत प्रशिक्षण इत्यादी सामाजिक उपक्रम राबविण्यात येणार आहेत. सदर विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन हे राष्ट्रीय सेवा योजना, कृषि महाविद्यालय, धुळे यांच्यातर्फे करण्यात आले असून डॉ. पी. एस. साखरे, डॉ. एस. एस. किंगे, डॉ. एल. जे. जावळे, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी कृषि महाविद्यालय, धुळे यांच्यामार्फत नियोजनाचे काम पार पडले.

### कृषि महाविद्यालय, धुळे मार्फत कापडणे येथे शेतकरी मेळाव्याचे आयोजन

**दि. २७ जानेवारी, २०२६.** कृषि महाविद्यालय, धुळे मार्फत ग्रामीण जागरूकता आणि औद्योगिक कार्यानुभव कार्यक्रम अंतर्गत कापडणे येथे शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यास प्रमुख अतिथी व मार्गदर्शक म्हणून महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. बी. एम. इल्हे उपस्थित होते. यावेळी कृषि विज्ञान केंद्रातील पीक संरक्षण विषय तज्ञ डॉ. पी. पी. पाटील, कार्यक्रम समन्वयक डॉ. जे. एच. गायकवाड, कार्यक्रम अधिकारी डॉ. पी. एस. कुलकर्णी, सरपंच श्रीमती अक्काबाई भिल्ल, धुळे जिल्हा शेतकरी संघटनेचे माजी अध्यक्ष श्री. आत्माराम पाटील, सहाय्यक कृषि अधिकारी श्री. नितीन मासुळे, ग्रामसेवक श्री. विशाल अकलाडे आणि उपसरपंच श्री. विनोद बोरसे उपस्थित होते.

यावेळी डॉ. बी. एम. इल्हे मार्गदर्शन करताना म्हणाले की सध्याच्या बदलत्या वातावरणानुसार कांदा उत्पादन वाढीसाठी योग्य तंत्रज्ञानाचा अवलंब केला पाहिजे. यासाठी एकात्मिक पद्धतीचा अवलंब करावा. त्याचबरोबर कांदा पिकामध्ये लागवडीनंतरचे धोके



टाळण्यासाठी रोपवाटिका गादीवाफ्यावर घेऊन योग्य उपायांचा अवलंब करून लागवड करावी. लागवडीपूर्वी, लागवड करताना, लागवडीनंतर आणि साठवण करताना योग्य तंत्रज्ञानाचा अवलंब करावा. यामध्ये बीज प्रक्रिया, योग्य जमीन, पिकांची फेरपालट, रोपे प्रक्रिया, योग्य खतांचा वापर, जैविक कीड व रोग नियंत्रण, जिवाणू खतांचा वापर तसेच करपा रोग नियंत्रणासाठी लेबल क्लेम विद्यापीठ शिफारशीत औषधांचा उपयोग योग्य वेळी केला तर रोगांचे नियंत्रण होऊन उत्पादन वाढेल असे सांगितले. डॉ. पी. पी. पाटील यांनी जैविक बीज प्रक्रिया व खत व्यवस्थापन याबद्दल सविस्तर माहिती दिली. या शेतकरी मेळाव्यात प्रामुख्याने नैसर्गिक शेती तसेच कांदा, कापूस, बोर, आवळा, गहू, हरभरा अशा विविध पिकांवरील रोग, बीज प्रक्रिया, खत, फवारणी इत्यादी मुद्द्यांवर शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. तसेच शेतकऱ्यांच्या प्रश्नांना समर्पक उत्तरे देण्यात आली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. जे. एच. गायकवाड यांनी केले. आभार प्रदर्शन डॉ. पी. एस. कुलकर्णी यांनी केले.

## साकुर्डी जि. सातारा येथे कराड कृषि महाविद्यालयाचे श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन




**दि. २३ जानेवारी, २०२६.** कराड येथील यशवंतराव चव्हाण शासकीय कृषि महाविद्यालय अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन सातारा जिल्ह्यातील साकुर्डी येथे करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून कृषि महाविद्यालयाच्या सहयोगी अधिष्ठाता डॉ. इंदिरा घोणमोडे उपस्थित होत्या. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून सरपंच श्री. विश्वास निकम, ग्रामपंचायत सदस्य श्री. विकास डोंगरे, माजी सरपंच श्री. आनंदराव शिंदे, विकास सेवा सोसायटीचे अध्यक्ष श्री. तानाजी देवकर उपस्थित होते. यावेळी डॉ. घोणमोडे मार्गदर्शन करताना म्हणाल्या की व्यक्तिमत्व विकासासाठी समाज सेवा करणे अत्यंत आवश्यक आहे. समाजसेवेमधूनच राष्ट्रसेवा घडत असते. यावेळी त्यांनी राष्ट्रीय सेवा योजनेचा इतिहास आणि बोधचिन्हाचा अर्थ अधोरेखित केला. यावेळी श्री. निकम यांनी स्वयंसेवकांनी ग्रामदेवतेच्या मंदिराची स्वच्छता केल्याबद्दल समाधान व्यक्त केले आणि शिबिरासाठी सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले. शिबिराच्या सकाळच्या १७ मध्ये स्वयंसेवकांनी गावातील मंदिराचा परिसर स्वच्छ करून श्रमदानाची सुरुवात केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. अर्चना ताठे यांनी केले. सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ. ज्योती वाळके यांनी आभार मानले. या शिबिरामध्ये २५ स्वयंसेवक कार्यरत आहेत.

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

मफुकृवि ई वार्ता

जानेवारी २०२६



## कराड येथील कृषि महाविद्यालयात सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी



**दि. ३ जानेवारी, २०२६.** कराड येथील यशवंतराव चव्हाण शासकीय कृषि महाविद्यालयात थोर समाज सुधारिका सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सहयोगी अधिष्ठाता डॉ. इंदिरा घोणमोडे होत्या. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. प्रज्ञा पाटील उपस्थित होत्या. यावेळी अध्यक्षीय मार्गदर्शन करताना डॉ. इंदिरा घोणमोडे म्हणाल्या की सावित्रीबाई फुले यांना घडविण्याचे मोठे कार्य समाजसुधारक महात्मा फुले यांनी केले. कडवट व सनातनी विचारांच्या समाजामध्ये केलेले हे कार्य उल्लेखनीय आहे. सर्व क्षेत्रात महिला आघाडीवर असून त्या यशस्वीपणे आपल्या क्षेत्रात कार्य करीत आहेत. महाविद्यालयीन शिक्षण घेताना सर्व संसाधने विद्यार्थ्यांना सहज उपलब्ध होत आहेत. ही सर्व संसाधने आपल्या आई वडिलांनी कष्ट व मेहनत करून मिळवली आहेत याची जाणीव विद्यार्थ्यांनी ठेवावी. यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. प्रज्ञा पाटील म्हणाल्या की आजच्या स्पर्धात्मक युगामध्ये विद्यार्थ्यांमध्ये मानसिक ताणतणाव प्रचंड वाढलेला आहे. त्याचे आरोग्यावर गंभीर परिणाम होऊन अनेक मानसिक आजार बळावून आत्महत्येचे प्रमाण वाढले आहे. मोबाईलच्या अतिवापरामुळे त्याचा गंभीर परिणाम डोळ्यावर व मेंदूवर होत आहे. मुला–मुलींनी महाविद्यालयीन जीवनात आपल्या शारीरिक व मानसिक आरोग्याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. त्याकरिता नियमित व्यायाम, ध्यानधारणा, आवडत्या खेळामध्ये नैपुण्य दाखविणे, पुरेशी झोप घेणे, प्रथिनेयुक्त संपूर्ण आहार घेणे, फास्ट फूड टाळणे, थोर व्यक्तींची पुस्तके वाचणे गरजेचे आहे. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. ज्योती वाळके यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैष्णवी शिरसाळे व सारा नदाफ यांनी केले तर आभार डॉ. अर्चना ताठे यांनी मानले. या कार्यक्रमास विद्यार्थी परिषदेचे उपाध्यक्ष डॉ. कैलास काळे, सहाय्यक कुलसचिव डॉ. हेमंत सोनावणे तसेच प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## केंद्रीय कृषि विद्यापीठ, इम्फाळ येथील शास्त्रज्ञ व विद्यार्थ्यांची कोल्हापुर येथील मका संशोधन केंद्रास भेट





**दि. ३१ जानेवारी, २०२६.** कोल्हापूर जिल्ह्यातील कसबा बावडा येथील अखिल भारतीय समन्वित मका संशोधन प्रकल्पास इम्फाळ येथील केंद्रीय कृषि विद्यापीठातील कृषि महाविद्यालयाच्या तृतीय वर्षाच्या ८६ विद्यार्थ्यांनी भेट दिली. पूर्वेकडील सात राज्यांचा अंतर्भाव असणाऱ्या

केंद्रीय कृषि विद्यापीठातील डॉ. प्रमेश, डॉ. अविनाश, डॉ. सुमित्रा व डॉ. भूमिता हे चार शास्त्रज्ञ व दोन तांत्रिक अधिकारी तसेच विविध सात राज्यातील विद्यार्थ्यांचा यामध्ये समावेश होता. यावेळी सहयोगी संशोधन संचालक व मका संशोधन केंद्राचे मका पैदासकार डॉ. सुनील कराड, कृषि कीटकशास्त्रज्ञ डॉ. शैलेंद्र वाळे, कृषिविद्यावेत्ता डॉ. सुहास भिंगारदेवे उपस्थित होते. यावेळी डॉ. सुनील कराड यांनी उपस्थित शास्त्रज्ञ व विद्यार्थी यांना मका संशोधन केंद्राचा इतिहास व त्यामधील होत असलेल्या संशोधन कार्याची माहिती दिली. यावेळी त्यांनी प्रक्षेत्रावरील मका पिकाचे बीजोत्पादन व मका पैदास या विषयावर प्रात्यक्षिकासह माहिती दिली. याप्रसंगी आंतरराष्ट्रीय मका संशोधन केंद्र, मेक्सिको यांच्या सहकार्यातून अवर्षण प्रतिकारक मक्याची वाढ निर्मितीच्या संशोधन प्रयोगाची पाहणी शास्त्रज्ञ व विद्यार्थ्यांनी केली. यावेळी मका संशोधन केंद्र, कोल्हापूर निर्मित विविध वाणांचे बियाणे केंद्रीय कृषि विद्यापीठ येथील शास्त्रज्ञांकडून संशोधनात्मक प्रयोगासाठी घेण्यात आले. डॉ. शैलेंद्र वाळे यांनी अमेरिकन लष्करी अळी व खोडकिड यांचा जीवनक्रम, नियंत्रण व अद्ययावत प्रयोगशाळेमध्ये त्यांची जोपासना तसेच त्याचा चाळणी प्रयोगासाठी केला जाणारा वापर याविषयी माहिती दिली. सहाय्यक कृषि विद्यावेता डॉ. सुहास भिंगारदेवे यांनी कृषिविद्या विषयातील विविध संशोधनिक प्रयोग व संशोधन केंद्राच्या वतीने घेण्यात येणाऱ्या विविध विस्तार कार्यक्रमांचा आढावा सादर केला.

## क्रिकेट स्पर्धेत राजर्षी छत्रपती शाहू महाराज कृषि महाविद्यालयाचे यश



**दि. २६ जानेवारी २०२६.** कोल्हापूर येथील राजर्षी छत्रपती शाहू महाराज कृषि व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय येथे अंतरमहाविद्यालयीन क्रिकेट स्पर्धेत राजर्षी छत्रपती शाहू महाराज कृषि महाविद्यालयाने उपविजेतेपद पटकावले. महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ. सातापा खरबडे यांनी यावेळी विजेत्या संघास बक्षीस वितरण केले. याप्रसंगी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. शैलेश कांबळे, विद्यार्थी परिषदेचे उपाध्यक्ष डॉ. बी. टी. कोलगने, विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. डी. डी. पतंगे उपस्थित होते. डॉ. दीपक पोतदार व प्रा. एम. बी. गुंड यांनी संघ व्यवस्थापक म्हणून काम पाहिले. क्रीडा शिक्षक प्रा. आर.बी. बोरसे यांचे मार्गदर्शन या संघाला लाभले. या स्पर्धेसाठी राज्यातील दहा जिल्ह्यातील २८ संघ सहभागी झाले होते.

## चिपलीपाडा येथे नंदुरबार कृषि महाविद्यालयाच्या वतीने भव्य शेतकरी मेळाव्याचे आयोजन

**दि. ८ जानेवारी, २०२६.** नंदुरबार येथील कृषि महाविद्यालयातील ग्रामीण कृषि कार्यानुभव व कृषि उद्योग संलग्न उपक्रमांतर्गत मौजे चिपलीपाडा येथे भव्य शेतकरी मेळावा आणि मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शेतकरी मेळाव्याचे उद्घाटन धुळे जिल्हा परिषदेचे सदस्य डॉ. नितीन सूर्यवंशी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून चिपलीपाडा येथील सरपंच श्रीमती सुरेखा सूर्यवंशी उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ.यू. बी. होले होते. याप्रसंगी डॉ. यु.बी. होले यांनी रब्बी हंगाम पिकातील जैविक किड नियंत्रण या विषयावर मार्गदर्शन केले. डॉ. संदीप वाघ यांनी रब्बी पिकांवरील रोग आणि त्यांचे एकात्मिक व्यवस्थापन, डॉ. विजय बलसाने यांनी मृदसंधारणातून जलसंधारण कसे साध्य करावे, डॉ. भगवान गुंजाळ यांनी भविष्यातील गरजा लक्षात घेऊन शाश्वत शेतीचा अवलंब तर श्री. विजय चौरे, यांनी बाजारपेठेविषयी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी कृषि महाविद्यालयाच्या कृषि कन्या मयुरी चौरे, प्रांजली पवार, गौरी जाधव, ऋषिका वळवी, स्नेहा ठाकरे, मनीषा चौरे, वैष्णवी फरदे, प्रतीक्षा गवळी, सेजल पवार यांनी परिश्रम घेतले. समन्वयक डॉ. दिनेश सूर्यवंशी, चेअरमन प्रा. साहेबराव पाटोळे यांच्या



मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी झिरणी पाडाच्या श्रीमती बेबीबाई पवार, गवळीविहिरीच्या श्रीमती प्रभावती अहिरे, भोरटीपाडाच्या सरपंच श्रीमती रंजना साबळे, श्री. संदीप अहिरे, श्री. रोहिदास पवार, श्री. विजय चौधरी व श्री.रेकजी पवार इत्यादी उपसरपंच तसेच विद्यार्थी व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नंदुरबार कृषि महाविद्यालयाच्या वतीने विशेष श्रमसंस्कार निवासी शिबिराचे आयोजन




**दि. १ जानेवारी, २०२६.** नंदुरबार येथील शासकीय कृषि महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना एककातर्फे पाणलोट व्यवस्थापन आणि पडीक जमीन विकासाद्वारे शाश्वत विकासासाठी युवा या संकल्पनेवर आधारित विशेष समसंस्कार निवासी शिबिराचे आयोजन काळटोळमी ता. नंदुरबार येथे करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून वाघाळेच्या सरपंच श्रीमती सुषमा पवार उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी सहयोगी अधिष्ठाता डॉ. यू.बी. होले होते. यावेळी व्यासपीठावर आत्माचे प्रकल्प संचालक श्री. दीपक पटेल, उपसरपंच श्री. गणेश चौरे, विद्यार्थी परिषदेचे उपाध्यक्ष डॉ. प्रेमसिंग गिरासे, विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. दिनेश सूर्यवंशी उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. होले म्हणाले की स्वयंसेवकांनी नैसर्गिक वातावरणात राहून स्व विकासासोबतच व्यक्तिमत्व विकास साधावा. सामाजिक बांधिलकी जपत श्रमदानातून गावासाठी स्मरणीय कार्य करावे. श्रीमती सुषमा पवार यावेळी म्हणाल्या की राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी काळटोळमी गावाला आवश्यक उपाययोजना सुचवाव्यात. यामुळे गावाच्या विकासात निश्चितच भर पडेल. श्री. दीपक पाटील यावेळी म्हणाले की राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी ग्रामीण भागात राहून निसर्गाचा प्रत्यक्ष अनुभव घ्यावा. गावाची गरज ओळखून श्रमदानातून वनराई बंधारे आणि पाणलोट विकासाचे प्रकल्प राबवावेत. एक ते सात जानेवारी २०२६ या कालावधीत चालणाऱ्या शिबिरात पडीक जमिनीवर फळझाड लागवड व शाश्वत शेती, शेतीमध्ये आधुनिक ड्रोन तंत्रज्ञानाचा वापर, पाणलोट क्षेत्र व पशुधन व्यवस्थापन, विद्यार्थ्यांचे मानसिक आरोग्य आणि व्यक्तिमत्व विकास या विविध विषयांवर तज्ञांचे मार्गदर्शन लाभणार आहे. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. संजय आगळे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रांजली वसावे व सुनंदा भागीत यांनी तर आभार स्नेहा साबळे हिने मानले. या शिबिराच्या यशस्वीतेसाठी सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ. सुनंदा गावित, प्रा. अश्वमेघराज खोंडे, कृषि सहाय्यक श्री.संतोष नागरे, श्री.संदीप नेरकर यांनी परिश्रम घेतले.

## नंदुरबार कृषि महाविद्यालयाच्या श्रमसंस्कार निवासी शिबिराची सांगता



**दि. ७ जानेवारी २०२६.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ राहुरी अंतर्गत असलेल्या नंदुरबार येथील शासकीय कृषि महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना एककातर्फे काळोळ मी काळटोळमी मी येथे आयोजित शाश्वत विकासासाठी युवा या संकल्पनेवरील विशेष श्रमसंस्कार शिबिराची शिबिराच्या सांगता समारंभ पार पडला या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. यु.बी. होले होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून वाघाळेच्या सरपंच सुषमा पवार उपस्थित होत्या. याप्रसंगी जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालयाचे तंत्र अधिकारी श्री. उमेश भदाणे, ग्रामविकास अधिकारी श्री.रावजी महाले, माजी सरपंच श्री.देविदास गांगुर्डे, सदस्य श्री.उत्तम चौरे, कल्पना गांगुर्डे, प्रगतशील शेतकरी एड. प्रकाश गांगुर्डे, श्री. गणेश चौरे, विद्यार्थी परिषदेचे उपाध्यक्ष डॉ. प्रेमसिंग गिरासे व विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. दिनेश सूर्यवंशी उपस्थित होते.

यावेळी डॉ. यु. बी. होले यांनी आपल्या मार्गदर्शनात विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासावर भर देत त्यांच्या सामाजिक बांधिलकीचे कौतुक केले. श्रीमती सुषमा पवार यांनी स्वयंसेवकांनी राबविलेली स्वच्छता मोहीम वृक्षारोपण आणि आंबा बागेच्या संगोपनाच्या कामाचे विशेष कौतुक केले. श्री. उमेश भदाणे आपल्या भाषणात म्हणाले की खेड्यात राहून प्रत्यक्ष नैसर्गिक अनुभव घेणे ही विद्यार्थ्यांसाठी मोठी संधी आहे. गावाच्या गरजेनुसार केलेले श्रमदान आणि वैचारिक प्रबोधनासाठी निवडलेले विषय विद्यार्थ्यांच्या भावी जीवनासाठी नक्कीच प्रेरणादायी ठरतील. कार्यक्रमाधिकारी डॉ. संजय आगळे यांनी शिबिराचा अहवाल मांडला. स्वयंसेवक हर्षदा भोई, संदीप पाडवी, शुभम जाधव, दिव्या चौरे व युवराज ठाकरे यांनी आपले अनुभव व्यक्त केले. प्रांजली वसावे व सुनंदा गावित यांनी सूत्रसंचालन केले. स्नेहा साबळे हिने आभार मानले. शिबिर यशस्वी करण्यासाठी सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ. सुनंदा गावित, प्रा. अश्वमेघराज खोंडे, कृषि सहाय्यक श्री.संतोष नागरे, श्री. संदीप नेरकर व ग्रामस्थांनी विशेष परिश्रम घेतले.

## संत मुक्ताई शासकीय कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथील प्राध्यापक व विद्यार्थ्यांची सायन्स टेकवर्क कृषि महोत्सव २०२५-२६ ला भेट



**दि. ५ जानेवारी २०२६.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत कार्यरत संत मुक्ताई शासकीय कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथील प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी सायन्स टेकवर्क कृषि महोत्सव २०२५-२६ ला भेट देऊन अत्याधुनिक शेती तंत्रज्ञान, सूक्ष्म सिंचन, केळी शेती व टिश्यू कल्चरवरील प्रात्यक्षिकांचा प्रत्यक्ष अनुभव घेत ज्ञान आत्मसात केले. जैन इरिगेशन सिस्टीम लि. जळगाव यांच्या वतीने जैन हिल्स येथे विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या मदतीने शेतीला फायदेशीर दिशा या संकल्पनेवर आधारित सायन्स टेकवर्क कृषि महोत्सव २०२५-२६ चे आयोजन करण्यात आले होते. या कृषि महोत्सवाला महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. संदीप पाटील, डॉ. गणेश देशमुख, प्रा. नामदेव धुर्वे व डॉ. ऐश्वर्या पाटील तसेच विद्यार्थी-विद्यार्थिनींनी भेट दिली. भेटीदरम्यान




प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी जैन इरिगेशनचे उपाध्यक्ष तथा वरिष्ठ कृषि तज्ज्ञ डॉ. के. बी. पाटील यांच्याशी चर्चा व हितगुज केले. महोत्सवात आधुनिक शेती पद्धतींची प्रत्यक्ष प्रात्यक्षिके, हाय–टेक, प्रिसीजन व क्लायमेट–स्मार्ट शेती तंत्रज्ञान, मसाला पिके, ठिबक व तुषार सिंचन प्रणाली, आधुनिक पाईप्स उत्पादन तंत्रज्ञान, टिश्यू कल्चर केळी प्रात्यक्षिके, शिवार फेरी तसेच कृषि प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. विविध तंत्रज्ञान व उत्पादने दर्शविणाऱ्या स्टॉल्सना भेट देऊन विद्यार्थ्यांनी शास्त्रीय माहिती जाणून घेतली.

## संत मुक्ताई शासकीय कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे राष्ट्रीय युवा दिन साजरा



**दि. १२ जानेवारी २०२६.** संत मुक्ताई शासकीय कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे स्वामी विवेकानंद यांची जयंती राष्ट्रीय युवा दिन म्हणून तसेच राजमाता जिजाऊसाहेब भोसले यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रम महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. संदीप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला. कार्यक्रमाची सुरुवात स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊसाहेब भोसले यांच्या प्रतिमांचे पूजन व अभिवादन करून करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ. कुशल ढाके यांनी केले. कार्यक्रमास विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. गणेश देशमुख, श्री. सुशांत उके, डॉ. कुशल ढाके व डॉ. ऐश्वर्या पाटील, श्री. विवेक राऊत, श्री. सिद्धार्थ काळे, श्री. गणेश गावंडे, श्री. अशोक पाटील, श्री. संतोष गवई यांची उपस्थिती लाभली. यावेळी आपल्या भाषणात डॉ. गणेश देशमुख यांनी स्वामी विवेकानंद यांच्या जीवनातील प्रेरणादायी प्रसंग मांडत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. स्वामी विवेकानंद यांची जयंती राष्ट्रीय युवा दिन म्हणून साजरी करण्यामागील उद्देश स्पष्ट करताना त्यांनी सांगितले की, चरित्र, धैर्य, आत्मविश्वास आणि राष्ट्रनिर्मितीविषयीचे त्यांचे विचार आजही युवा पिढीस प्रेरणा देतात. राष्ट्रीय युवा दिनाचा मुख्य हेतू तरुणांना प्रेरित करणे, त्यांच्यात राष्ट्रनिर्मितीची भावना जागृत करणे व सकारात्मक विचारांचा प्रसार करणे हा आहे असे त्यांनी नमूद केले. याप्रसंगी महाविद्यालयातील विद्यार्थी–विद्यार्थिनींनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक तसेच कार्यक्रम अधिकारी श्री. नामदेव धुर्वे, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ. कुशल ढाके व डॉ. ऐश्वर्या पाटील यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन डॉ. कुशल ढाके यांनी केले.

## संत मुक्ताई शासकीय कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे नेताजी सुभाषचंद्र बोस आणि बाळासाहेब ठाकरे जयंती साजरी



**दि. २३.०१.२०२६.** संत मुक्ताई शासकीय कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे दि. २३ जानेवारी २०२६ रोजी नेताजी सुभाषचंद्र बोस आणि हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांची जयंती महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. संदीप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात नेताजी सुभाषचंद्र बोस व बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमांचे पूजन व अभिवादन करून करण्यात आली. यावेळी आपल्या मनोगतात विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. गणेश देशमुख यांनी दोन्ही महान व्यक्तिमत्त्वांच्या जीवनातील प्रेरणादायी प्रसंग मांडत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी भारताच्या स्वातंत्र्य संग्रामात दिलेल्या मोलाच्या योगदानाचा उल्लेख करताना त्यांनी त्यांच्या तुम मुझे खून दो, मैं तुम्हें आज़ादी दूँगा या प्रेरणादायी घोषवाक्याची आठवण करून दिली. तसेच बाळासाहेब ठाकरे यांच्या नेतृत्वगुणांविषयी व सामाजिक कार्याविषयीही मार्गदर्शन करण्यात आले. या प्रसंगी महाविद्यालयातील विद्यार्थी–विद्यार्थिनींनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक तसेच सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ. कुशल ढाके, श्री. विवेक राऊत, श्री. सिद्धार्थ काळे, श्री. अशोक पाटील व श्री. संतोष गवई यांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. मानसी देसाई यांनी केले, तर आभार प्रदर्शन अनिकेत बोरसे यांनी केले.

## संत मुक्ताई शासकीय कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे ७७ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा





**दि. २६ जानेवारी २०२६.** संत मुक्ताई शासकीय कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे ७७ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. संदीप पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. याप्रसंगी मार्गदर्शन करताना डॉ. संदीप पाटील यांनी भारतीय संविधानाचा इतिहास सांगताना भारताचे संविधान जगातील सर्वश्रेष्ठ संविधानांपैकी एक असल्याचे प्रतिपादन केले. देशाला प्रजासत्ताक करण्यासाठी बलिदान दिलेल्या

स्वातंत्र्यसैनिकांचे योगदान आपण कधीही विसरू शकत नाही असे त्यांनी नमूद केले. तसेच कमी मनुष्यबळ असतानाही महाविद्यालय महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे सन्माननीय कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांच्या मार्गदर्शनाखाली उत्कृष्ट कार्य करत असल्याचे त्यांनी सांगितले. याप्रसंगी डॉ. गणेश देशमुख, डॉ. रियाज शेख, सहाय्यक कुलसचिव श्री. प्रशांत नागे, श्री. एन. जी. धुर्वे, डॉ. कुशल ढाके, डॉ. रवींद्र जाधव, डॉ. सागर बंड, श्री. सागर पाटील, डॉ. मनीषा पालवे, डॉ. आबासाहेब पराडे, श्री. विवेक राऊत, श्री. सिद्धार्थ काळे, श्री. गणेश गावंडे, श्री. अशोक पाटील, श्री. संतोष गवई तसेच सर्व कर्मचारी व विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते. ध्वजारोहणानंतर सर्व प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थ्यांनी महाविद्यालय परिसरात स्वच्छता अभियान राबविले.

## डॉ. संदीप पाटील प्रतिष्ठित आयएसईई फेलो पुरस्काराने सन्मानित




**दि. ३१ जानेवारी २०२६.** मुक्ताईनगरः संत मुक्ताई शासकीय कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगरचे सहयोगी अधिष्ठाता तथा कृषि विस्तार विभागाचे प्राध्यापक डॉ. संदीप पाटील यांना इंडियन सोसायटी ऑफ एक्स्टेंशन एज्युकेशन (ISEE), भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांच्या वतीने कृषि विस्तार शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय व अनुकरणीय कार्य तसेच दीर्घकालीन योगदानाबद्दल आयएसईई फेलो हा प्रतिष्ठित सन्मान प्रदान करण्यात आला.भारतीय विस्तार शिक्षण सोसायटीच्या गोवा येथे आयोजित शाश्वत अन्न प्रणाली आणि आत्मनिर्भर भारतासाठी डिजिटल तंत्रज्ञान या राष्ट्रीय परिषदेत भारतीय कृषि संशोधन परिषदेचे सहाय्यक महासंचालक डॉ. आर. के. सिंह आणि माजी उपमहासंचालक डॉ. ए. एस. गोतम यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. या सन्मानाबद्दल विद्यापीठाच्या विविध स्तरांतून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

डॉ. संदीप पाटील हे सुमारे २५ वर्षे कृषि विस्तार शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करीत आहेत. त्यांनी महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे दहा वर्षांहून अधिक काळ जनसंपर्क अधिकारी म्हणून यशस्वी सेवा बजावली आहे. त्यांनी कृषि महाविद्यालय, धुळे येथे सहा वर्षांहून अधिक काळ अध्यापन व संशोधनाची जबाबदारी सांभाळली आहे. सध्या ते संत मुक्ताई शासकीय कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे सहयोगी अधिष्ठाता व प्राध्यापक (कृषि विस्तार) म्हणून कार्यरत आहेत. तसेच ते गेल्या पाच वर्षांपासून भारतीय विस्तार शिक्षण सोसायटी व महाराष्ट्र सोसायटी ऑफ एक्स्टेंशन एज्युकेशनचे कार्यकारी सदस्य तसेच विविध शैक्षणिक व व्यावसायिक संस्थांचे आजीवन सदस्य म्हणून कार्यरत आहेत. अध्यापन, संशोधन, विद्यार्थी मार्गदर्शन तसेच शेतकरी प्रशिक्षण, प्रात्यक्षिके, युवक कृषि उद्योजकता, आदर्श गाव उपक्रम आणि माहिती तंत्रज्ञानाधारित कृषि सल्ला सेवा या माध्यमांतून त्यांनी व्यापक कार्य केले आहे. कृषि तंत्रज्ञान प्रसारासाठी आकाशवाणी, दूरदर्शन व वृत्तपत्रांद्वारेही त्यांनी मोलाचे योगदान दिले आहे. त्यांनी शेतकऱ्यांसाठी मार्गदर्शक पुस्तिका, कृषि विषयक लेख व विविध शैक्षणिक साहित्य प्रकाशित केले आहे. आतापर्यंत त्यांच्या ७५ हून अधिक संशोधन लेखांचे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय नियतकालिकांत प्रकाशन झाले असून अनेक पुस्तकांचे संपादनही त्यांनी केले आहे. विविध संशोधन प्रकल्पांमध्येही त्यांनी सक्रिय सहभाग नोंदविला आहे.

डॉ. पाटील यांना यापूर्वीही अनेक राज्यस्तरीय तसेच राष्ट्रीय स्तरावरील अनेक प्रतिष्ठित पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. त्यामध्ये भारतीय कृषि अनुसंधान परिषदेचा उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार २०२२ (रोख रक्कम रु. २५,०००/-, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र) तसेच इंडियन सोसायटी ऑफ एक्स्टेंशन एज्युकेशनचा युवा शास्त्रज्ञ पुरस्कार २०२१ यांचा समावेश आहे. या यशाबद्दल डॉ. पाटील यांचे महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे सन्माननीय कुलगुरू डॉ. विलास खर्चे, अधिष्ठाता कृषि डॉ. सातप्पा खरबडे, संशोधन संचालक डॉ. प्रशांत बोडके आणि

विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे यांनी अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत. डॉ. पाटील यांना प्राप्त झालेला आयएसईई फेलो हा सन्मान मुक्ताईनगर तसेच जळगाव जिल्ह्यासाठी अभिमानास्पद ठरला असून कृषि विस्तार शिक्षण क्षेत्रातील त्यांच्या कार्याची राष्ट्रीय पातळीवरील दखल म्हणून पाहिला जात आहे.

## कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी



**दि. ३ जानेवारी, २०२६.** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृषि महाविद्यालय हाळगाव येथे राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची १९५ वी जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाची सुरुवात सहयोगी अधिष्ठाता डॉ. दत्तात्रय सोनवणे यांच्या हस्ते स्त्री शिक्षणाच्या प्रणेत्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी स्वयंसेवक कु. अनुजा जाधव, कु. पायल इंगळे व कु. तेजस्विनी गळवे यांनी थोर समाजसुधारिका सावित्रीबाई फुले यांच्या जीवनकार्यावर आपले विचार व्यक्त केले. त्यांनी स्त्री शिक्षणाचे महत्त्व, सामाजिक समतेसाठी केलेला संघर्ष व सावित्रीबाई फुले यांच्या प्रेरणादायी कार्याची माहिती सांगितली. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार चि. अभिमन्यू ढुस यांनी केले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी–विद्यार्थिनी उपस्थित होते.

## कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ यांची जयंती साजरी



**दि. १२ जानेवारी, २०२६.** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ यांची जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या प्रारंभी सहयोगी अधिष्ठाता डॉ. दत्तात्रय सोनवणे यांच्या हस्ते स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेला पुष्पहार अपर्ण करून अभिवादन करण्यात आले. स्वयंसेवक कु. नम्रता कदम, कु. प्राजक्ता कदम व चि. हर्षल काकडे यांनी स्वामी विवेकानंद यांची भारतीय आध्यात्मिक गुरू, तत्त्वज्ञ, समाजसुधारक, रामकृष्ण परमहंस यांचे शिष्य आणि हिंदू धर्म व भारतीय संस्कृतीचा प्रसार आणि प्रचार पाश्चात्य जगात करणारे महान संन्यासी अशी ओळख मनोगतातून पटवून

दिली. तसेच, राजमाता जिजाऊ केवळ शिवरायांची आई नव्हे तर त्या स्वराज्याच्या आद्य शिल्पकार असून अन्यायाविरुद्ध आवाज उठवण्याची हिंमत, स्वाभिमान जपण्याची वृत्ती आणि धर्माबद्दलची निष्ठा हे त्यांच्यामधील स्वभाव गुण उदाहरणासहीत स्पष्ट केले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी–विद्यार्थिनी उपस्थित होते.

## कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे नेताजी सुभाषचंद्र बोस व हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांची जयंती साजरी



**दि. २३ जानेवारी, २०२६.** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत नेताजी सुभाषचंद्र बोस व हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांची जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाची सुरुवात सहयोगी अधिष्ठाता डॉ. दत्तात्रय सोनवणे यांच्या हस्ते नेताजी सुभाषचंद्र बोस व हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. त्यानंतर, विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. विवेकानंद कुलकर्णी यांनी नेताजी सुभाषचंद्र बोस व हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रेरणादायी कार्याची माहिती सांगितली. नेताजी सुभाषचंद्र बोस हे भारतीय स्वातंत्र्य संग्रामातील एक वीर नेते होते अशी ओळख त्यांनी विद्यार्थ्यांना पटवून दिली. नेताजींनी भारतीय जनतेला स्वातंत्र्याकडे प्रेरित केले आणि स्वातंत्र्य लढ्यात महत्वपूर्ण योगदान दिले असे स्पष्ट केले. हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे हे शिवसेना पक्षाचे संस्थापक, राजकारणी, व्यंगचित्रकार, सामना दैनिकाचे संस्थापक व मुख्य संपादक होते व त्यांनी मराठी अस्मिता टिकविण्यासाठी कार्य केले अशी माहिती दिली. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी–विद्यार्थिनी उपस्थित होते.

## कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे ७७ वा प्रजासत्ताक दिन साजरा



**दि. २६ जानेवारी, २०२६.** कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे ७७ वा प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. यावेळी सहयोगी अधिष्ठाता डॉ. दत्तात्रय सोनवणे यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले. यावेळी मार्गदर्शन करतांना ते म्हणाले की २६ जानेवारी १९५० रोजी भारतीय संविधान लागू झाल्याच्या निमित्ताने प्रजासत्ताक दिन हा भारतासाठी एक महत्त्वाचा राष्ट्रीय सण आहे. या दिवशी भारत एक सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही प्रजासत्ताक बनला. आपल्या देशाच्या संविधानाची निर्मिती भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि

त्यांच्या सहकाऱ्यांनी अत्यंत मेहनत घेऊन केली. या दिवसाचे खरे महत्त्व हे केवळ उत्सव साजरा करण्यात नाही, तर आपले राष्ट्रीय कर्तव्य लक्षात ठेवून संविधानाच्या तत्वांचा आदर आणि त्याचे पालन करण्यात आहे. विद्यार्थी म्हणून, आपल्याला शिक्षणाच्या माध्यमातून देशाच्या उन्नतीसाठी काम करावे लागेल. आपण जर शिक्षणात प्रगती केली, नैतिक मूल्यांचा अंगीकार केला, आणि आपल्या कर्तव्यांचे पालन केले, तर नक्कीच आपण देशासाठी एक प्रेरणा बनू शकतो. विद्यापीठाने विविध पिकांचे सुधारित वाण, माती परीक्षण, जैविक खते, संशोधन शिफारसी आणि कृषि यंत्रे तयार करून प्रसारीत केली आहेत. त्याचा फायदा महाविद्यालय परिसरातील शेतकरी बांधवांनी घ्यावा, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

आपल्या अध्यक्षीय भाषणातून त्यांनी विद्यार्थी, प्रक्षेत्र, शेतकरी विकासासाठी राबवलेल्या विविध उपक्रमांचा इतिवृतांत सादर केला. या महाविद्यालयाच्या पंचक्रोशीतील शेतकरी बांधवाना सुधारित तंत्रज्ञानाचा लाभ होण्यासाठी शेतकरी शास्त्रज्ञ मंच स्थापन केलेला असून यामध्ये ५० शेतकऱ्यांची नोंद झालेली आहे. महाविद्यालयाच्या विकासासाठी नविन विहीर, शेततळे, जैविक खत निर्मिती, प्रक्षेत्र विकास, फळबाग लागवड इत्यादी प्रस्तावित उपक्रम सुरू असलेचे सांगितले. कार्यक्रमादरम्यान, १८ वर्ष पूर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना डॉ. सोनवणे यांच्या हस्ते नागरिकत्वाची प्रतिज्ञा बहाल करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभागाच्या सहाय्यक प्राध्यापिका डॉ. निकीता धाडगे यांनी केले तर आभार प्रदर्शन विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. विवेकानंद कुलकर्णी यांनी केले. कार्यक्रमाला महाविद्यालयाचे सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी–विद्यार्थिनी व ग्रामस्थ उपस्थित होते.

## जवळा येथे कृषि महाविद्यालय, हाळगावचे विशेष श्रमसंस्कार शिबिर संपन्न





**दि. २७ जानेवारी, २०२६.** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय कृषि महाविद्यालय, हाळगाव ता. जामखेड येथील तृतीय वर्ष विद्यार्थी, विद्यार्थिनींचे राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार शिबिर जवळा या गावात महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. दत्तात्रय सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मृदशास्त्रज्ञ विभागाच्या सहयोगी प्राध्यापिका डॉ. प्रेरणा भोसले होत्या. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणुन जामखेड तालुक्याचे तहसीलदार श्री. मच्छिंद्र पाडळे होते. आपल्या यावेळी श्री. मच्छिंद्र पाडळे मार्गदर्शनात म्हणाले की कृषि भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. कृषि पदवीधर हा त्यातील एक महत्त्वाचा घटक आहे. राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय कृषि महाविद्यालयाने विशेष श्रमसंस्कार शिबिर आयोजित केले आणि या शिबिरामार्फत जवळा गावाचा विकास होण्यास मदत होईल.

उद्घाटन कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान सहयोगी प्राध्यापक, मृदाशास्त्र डॉ. प्रेरणा भोसले यांनी भूषवले. कार्यक्रम अधिकारी राष्ट्रीय सेवा योजना प्रा. पोपटराव पवार यांनी आपल्या प्रास्ताविकात सात दिवसाच्या कार्यक्रमाची रूपरेषा स्पष्ट केली. सदर कार्यक्रमासाठी जवळा गावचे सरपंच श्री. सुशील आव्हाड, उपसरपंच सौ. शितल शिंदे, दैनिक सकाळचे पत्रकार श्री. संतराम सुळ, पोलीस पाटील सौ. सुनीता वाळुंजकर, जवळा विकास सोसायटीचे चेअरमन श्री. चंद्रकांत पागिरे, सुजाता स्मृती क्लिनिक डॉ. दीपक वाळुंजकर, सहयोगी प्राध्यापक कृषि विस्तार शिक्षण डॉ. गोकुळ वामन, विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. विवेकानंद कुलकर्णी, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. पोपटराव पवार, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी राष्ट्रीय सेवा योजना डॉ. संदीप मोरे उपस्थित होते.

दि. २३ ते २७ जानेवारी, २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या शिबिरात स्वयंसेवकांमार्फत ग्रामस्वच्छता अभियान,

समाज प्रबोधनपर फेरी, अंधश्रद्धा निर्मुलन पथनाट्य, ऑईल मिल व जवळेश्वर दुध संकलन केंद्र भेट, वृक्षारोपण इत्यादी उपक्रम राबविण्यात आले. तसेच, शिबिरा दरम्यान महाविद्यालयातील सहाय्यक प्राध्यापक उद्यानविद्या विभाग डॉ. संदीप मोरे यांनी सेंद्रिय परसबाग व सेंद्रिय भाजीपाला लागवड, सहाय्यक प्राध्यापक कृषि अभियांत्रिकी विभाग डॉ. महेश निकम यांनी शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, सहाय्यक प्राध्यापिका पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग डॉ. निकीता धाडगे यांनी पशुधन व्यवस्थापन व दुग्धपदार्थ उत्पादन व सहाय्यक प्राध्यापक मृदाशास्त्र व कृषि रसायनशास्त्र विभाग डॉ. अनिकेत गायकवाड यांनी कृषि शिक्षण क्षेत्रातील व्यावसायिक अभ्यासक्रम व संधी या विषयांवर शालेय विद्यार्थी व शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. सदरील विशेष श्रमसंस्कार शिबिरामध्ये २३ स्वयंसेवक सहभागी झाले होते.

**प्रकाशक** : **डॉ. गोरक्ष ससाणे**
संचालक, विस्तार शिक्षण
**प्रमुख संपादक** : **डॉ. सचिन सदाफळ**
प्रभारी अधिकारी, प्रसारण केंद्र
**सहसंपादक** : **श्री. सुनिल राजमाने**
कनिष्ठ संशोधन सहाय्यक, प्रसारण केंद्र
**डिझाईनर** : **श्री. प्रदिप कोळपकर**
कलाकार तथा छायाचित्रकार, प्रसारण केंद्र
**श्री. सिध्दार्थ साळवे**
लिपीक–नि–टंकलेखक, प्रसारण केंद्र
**मफुकृवि विस्तार प्रकाशन क्र. २८४१/२०२६**